**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.आर.कुलकर्णी यांचे मार्फत सुरुः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – लहू राम जन्मले,

वय – ४५ वर्षे, व्यवसायः चालक,

राहणार – रा.बाकली, ता.शिरुर अनंतपाळ, जि. लातूर.

मी भारत गॅसच्या गाडीवर चालक म्हणून काम करतो. मला चार मुली आहेत व एक मुलगा आहे. मी आरोपी क्र.१ ते ३ यांना ओळखतो. आरोपी क्र.१ ते ३ आज न्यायालयात हजर आहेत. माझी मुलगी संध्याराणी ही घटना घडली तेव्हा आठवी वर्गात शिकत होती. मला घटनेविषयी माहिती नाही. मी बाहेर होतो. घटनेला पाच–सहा वर्षे झाली. घटना गावात घडली. त्या दिवशी किरकिऱ्या झाल्या होत्या. त्यामुळे मी शिरुर अनंतपाळ पोलीस स्टेशन येथे जाऊन अर्ज दिला होता. पोलीस स्टेशनला दिलेला अर्ज दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला जबाब दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. परंतु त्यामधील मजकुर मला माहीत नाही. त्यामुळे सहीस ओळखीपुरता **नि.क्र.३३** देण्यात येतो. असे काही घडले नाही की, आरोपी क्र.१ ते ३ यांनी मला शिवीगाळ केली, आरोपी क्र.३ यांनी मला कुऱ्हाडीच्या दांडयाने डोक्यात मारुन जखमी केले, आरोपी क्र.१ ने काठीने डाव्या मनगटावर मारल्याने हातास सुज आली आणि आरोपी क्र.२ ने दगडाने अंगावर मुक्का मार दिला.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली**.

२. दि.०३/०१/२०१९ रोजी मी सकाळी १०.०० वाजता सोलापूर येथून गावी आलो होतो का हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी संध्याराणी हिने मला आरोपी क्र.२ व ३ हे शाळेत येता–जाता मला त्रास देतात असे सांगितल्याने मी आरोपी क.१ यांच्याकडे तुमच्या मुलांना समजून सांगा म्हणून गेलो होतो. साक्षीदारास त्याच्या जबाबातील व पुरवणी जबाबातील अधोरेखांकीत भाग अ वाचून दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, अधोरेखांकीत भाग अ प्रमाणे घटना घडलेली आहे. पोलीसांनी माझ्या जबाबात असे का लिहले त्याचे कारण मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आणि माझ्यामधील वाद मिटला असल्याने आरोपीला वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे अॅड.व्ही.बी.कांबळे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.04.06 16:51:12 +0530

(**श्रीमती.के.पी.गाडे**)

दिनांक–०६/०४/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,
निलंगा